# ॥ज्योतिर्मय॥

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २२५ वा ❑ गुरूवार दि.३० ऑक्टोबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## चीनसाठी भगवद्गीतेचे महत्त्व

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

भारतात काही लोक भगवद्गीतेचा विरोध करतात. चीनला भगवद्गीतेचे महत्त्व व ज्ञान कळले. म्हणून चिनी विद्वान भगवद्गीतेला ''ज्ञानाचे अमृत'' आणि ''भारतीय संस्कृतीचा लघु इतिहास'' मानतात, जे आजच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी व्यावहारिक मार्गदर्शन प्रदान, जे कर्तव्य, अलिप्तता आणि सुसंवाद शिकवते. हे ज्ञान चीनसारख्या धर्मनिरपेक्ष समाजालाही त्याच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक मुळांशी जोडण्यासाठी एक ठोस मार्ग प्रदान करू शकते,असा चिनी विद्वान सांगतात.

गीतेतील शिकवणी आजच्या काळासाठी अत्यंत प्रासंगिक आहेत, आध्यात्मिक आणि भौतिक दोन्ही प्रकारच्या दुविधांना उत्तरे देतात.

हा ग्रंथ चिनी लोकांना त्यांच्या सांस्कृतिक मुळांशी जोडण्यास प्रोत्साहित करू शकतो, कारण त्याची मूल्ये (जसे की कर्तव्य आणि सुसंवाद) कन्फ्यूशियनिझमसारख्या पारंपारिक चिनी मूल्यांशी जुळतात.जागतिक आव्हानांना तोंड देण्याचे सामर्थ्य भगवद्गीतेत आहे.गीतेत वर्णन केलेली तत्त्वे आधुनिक जगाच्या समस्यांना तोंड देण्यासाठी उपयुक्त अंतर्दृष्टी प्रदान करतात चीनमध्ये प्रथमच भगवद्गीतेच्या चिनी आवृत्तीचे प्रकाशन दोन्ही देशांमधील प्राचीन सांस्कृतिक संबंध प्रतिबिंबित करते आणि परस्पर समज वाढवते.हे शास्त्र लोकांना सत्याच्या जवळ आणते, अंधश्रद्धेपासून दूर करते आणि आत्मविश्वास आणि कृती करण्यापूर्वी विचार करण्याची क्षमता विकसित करण्यास मदत करते.

भारतात भगवद्गीतेला विरोध नाही, तर शाळांमध्ये ती अनिवार्य करण्याच्या मुद्द्यासारख्या विशिष्ट संदर्भात वादग्रस्त आहे. भारतातील हा एक पवित्र धार्मिक आणि तात्त्विक ग्रंथ आहे आणि त्याला विरोध प्रामुख्याने त्याच्या भारतीय उत्पत्तीमुळे नाही, तर तो कसा सादर केला जातो आणि शिक्षण व्यवस्थेत त्याचे स्थान काय आहे यावरून आहे.

काही जण ते पूर्णपणे धार्मिक ग्रंथ मानतात, तर काही जण ते भारतीय तत्वज्ञानाचा एक महत्त्वाचा ग्रंथ मानतात. धर्मनिरपेक्ष किंवा बहुधार्मिक देशाच्या शिक्षण व्यवस्थेत ते अनिवार्य करण्याचा प्रयत्न केला जातो तेव्हा अनेकदा विरोध होतो, कारण यामुळे इतर धर्मीयांना त्रास होऊ शकतो.

गुजरात आणि कर्नाटक सारख्या राज्यांमध्ये शालेय अभ्यासक्रमात गीता समाविष्ट करण्याच्या निर्णयाला सोशल मीडियावर पाठिंबा आणि विरोध दोन्ही दिसून आले.शाळांमध्ये हिजाबवर बंदी घालता येते तर गीता का शिकवली जात आहे असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की भारताबाहेरही भगवद्गीतेला धार्मिक किंवा तात्त्विक ग्रंथ म्हणून आदर दिला जातो. उदाहरणार्थ, एका रशियन न्यायालयाने भगवद्गीतेच्या आवृत्तीवर बंदी घालण्याची मागणी फेटाळून लावली, ज्यामुळे भारतात निदर्शने सुरू झाली.

खरं तर, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये भारतीय ज्ञान परंपरेचा उल्लेख आहे. या अंतर्गत, मुलांना त्यांच्या संस्कृतीची ओळख करून द्यायची आहे. अशा परिस्थितीत, उत्तराखंड सरकारने मुलांना भारतीय ज्ञान परंपरेची माहिती देण्यासाठी एक मोठा उपक्रम सुरू केला आहे. या संदर्भात, ६ मे रोजी, मुख्यमंत्री पुष्कर धामी यांनी शिक्षण विभागाची आढावा बैठक घेतली. या बैठकीत, त्यांनी अधिकाऱ्यांना नवीन शिक्षण धोरणात केलेल्या भारतीय ज्ञान परंपरेच्या तरतुदींनुसार मुलांच्या अभ्यासक्रमात श्रीमद् भगवद्गीता/ श्रीमद् भगवद्गीता आणि रामायण समाविष्ट करण्याचे निर्देश दिले.

शाळांमध्ये ही प्रणाली लागू झाल्यानंतर, केवळ विरोधी पक्षांनीच नव्हे तर अनुसूचित जाती आणि जमाती शिक्षक संघटनांनीही प्रश्न उपस्थित करण्यास सुरुवात केली आहे. याचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संविधानाच्या कलम २८(१) मध्ये असे म्हटले आहे की सरकारकडून पूर्णपणे किंवा अंशतः निधी मिळणाऱ्या शैक्षणिक संस्थांमध्ये धार्मिक शिक्षण दिले जाऊ शकत नाही. माध्यमिक शिक्षण विभागाच्या या निर्णयामुळे निषेध व्यक्त होत आहेत.

खरं तर भागवतगीता ही योग, भक्ती आणि ज्ञानाचा संगम आहे आणि भगवद्गीतेमधील तत्त्वे आजही अत्यंत प्रासंगिक आहेत.भगवद्गीतेचे महत्त्व म्हणजे जीवनातील आव्हानांना तोंड देणे, योग्य आणि अयोग्य यात फरक करणे आणि आत्मज्ञान प्राप्त करणे. ते एखाद्याला परिणामांची (निष्काम कर्माची) चिंता न करता कृती करण्यास प्रेरित करते, ज्यामुळे जीवनात शांती आणि समाधान मिळते.

गीतेतील श्लोक आपल्याला जीवनातील समस्या आणि भीतींना तोंड देण्याचा आणि मानसिक शांती प्रदान करण्याचा आत्मविश्वास देतात.हे श्लोक आपल्याला आपल्या खऱ्या स्वभावाशी आणि आत्म्याच्या ज्ञानाशी जोडतात आणि इंद्रिये आणि मनावर नियंत्रण कसे ठेवायचे हे शिकवतात.

गीतेतील श्लोक जगण्याची व्यावहारिक कला शिकवते, जी आपल्याला भौतिकवाद आणि दुर्गुणांपासून दूर राहण्यास मदत करते.

गीता कोणत्याही विशिष्ट जाती, धर्म किंवा लिंगासाठी नाही; उलट, हा एक असा श्लोक आहे जो प्रत्येक युगातील प्रत्येकासाठी उपयुक्त आहे.महात्मा गांधींसारख्या अनेक महान व्यक्तींचा असा विश्वास होता की जेव्हा जेव्हा त्यांना समस्या येतात तेव्हा गीतेने त्यांना उपाय दिले.

भगवद्गीता आपल्याला आपल्या समृद्ध संस्कृती आणि परंपरेची ओळख करून देते.भगवद्गीतेतील श्लोकांचे पठण केल्याने आपल्याला दैनंदिन जीवनातील विविध समस्यांवर उपाय शोधण्यास मदत होऊ शकते.

भगवद्गीता वाचल्याने आपल्याला जीवनाबद्दलचे सत्य कळते आणि अंधश्रद्धा आणि खोट्या श्रद्धांपासून मुक्त होण्यास मदत होते. गीतेतून मिळालेले ज्ञान आपल्या शंका दूर करते आणि आपला आत्मविश्वास वाढवते. गीतेतील शिकवण आपल्याला कृती करण्यापूर्वी काळजीपूर्वक विचार करण्यास सांगते.

# हास्यश्री ठरवणारा तिसरा पंच

**विनोदी साहित्याचे आकर्षण असणाऱ्या वाचकांना तिसरा पंच या लेखसंग्रहात कौटुंबिक, सामाजिक आणि राजकीय विनोदाची आतषबाजी अनुभवायला मिळेल.**

**ज्योतिर्मय साहित्य**

जीवनातील विसंगती, त्यातील हास्यास्पदता आपल्या स्वत:च्या टवटवीत विनोदी शैलीत मांडताना त्यात प्रभुत्व राखणाऱ्या परेरांचे 'तिसरा पंच' हे नवे पुस्तक नुकतेच विनोदी साहित्य आवडणाऱ्या वाचकांसाठी उपलब्ध झाले आहे. आधीच्या दोन लेखसंग्रहांप्रमाणेच प्रस्तुत संग्रहातदेखील वाचकांना सुखावणारे असंख्य पंच लगावत सॅबी परेरांनी विनोदाची आतषबाजी उडवली आहे.

सोशल मीडियाचा वापर करून लेखक म्हणून नाव मिळवते झालेले परेरा हे प्रासंगिक विनोदाचा धागा पकडून त्याला सर्वकालीन संदर्भांची जोड देत त्या धाग्यातून सर्वांना सुखावणारा विनोदाचा शेला वाचकांना बहाल करत असतात. 'तिसरा पंच' हे पुस्तकही असेच आहे. यातील लेखांपैकी काही लेख दिवाळी अंकांतून प्रसिद्ध झाले असले तरी बहुतांश लेख हे विविध वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेले आहेत.

लोकांना हसवणे हा सर्वात कठीण प्रकार असून, संवादातून किंवा लिखाणातून हसवण्यासाठी फार मोठे कौशल्य लागते. लिखाणातून हसवताना कोणत्याही विनोदी लेखकाला आपल्या लिखाणाच्या शीर्षकातून वाचकाचे कुतूहल जागे करता आले की वाचक त्या लेखनाकडे आकर्षित होतो. या संदर्भाने बघितले तर परेरांच्या काही लेखांची शीर्षके वाचूनच त्यात काय मजकूर असेल याची उत्सुकता जागी




होते. वानगीदाखल सांगायचे झाल्यास 'सेमीप्रामाणिक मुंबईकर', 'ऑनलाइन समाजसेवक', 'तुंबईचा पाऊस', 'जग उंदरांनी आक्रमिले', 'मासेपियंस', 'पुरुष नामशेष होताहेत', 'पाकिस्तानची गाढवं', 'भ्रष्टाचार झालाच पाहिजे' ही शीर्षके प्रचंड उत्सुकता निर्माण करणारी आहेत.

आपले लिखाण वाचण्यासाठी उत्सुक झालेल्या वाचकाचा कुठेही रसभंग होऊ न देता त्रयोदशगुणी विड्याचे पान जसे रंगावे तसा परेरांचा विनोद रंगत जातो. स्तंभलेखनाच्या शब्दमर्यादेचा एक फायदा असा झालाय की, लेखक परेरा हे त्यांना सुचलेला विनोदाचा विषय, फापटपसारा टाळून अतिशय नेटकेपणाने फुलवत असतात. त्यांच्या लिखाणात कौटुंबिक, सामाजिक, राजकीय अशा सर्व विषयांना स्पर्श केलेला दिसून येतो.

अर्थात त्यामागे त्यांचे चतुरस्रा व्यक्तिमत्त्व आहे. सूक्ष्म असे सामाजिक निरीक्षणाचे त्यांचे सामर्थ्य त्यांना विनोद फुलवताना कामाला येते.

सूक्ष्म निरीक्षणाचे सामर्थ्य असलेल्या लेखकाला रूढ विषयांमध्ये नव्याने विविध रंग भरता येतात. उदाहरणार्थ, कौटुंबिक विनोदात पती–पत्नीचे नाते हा एक रूढ विनोद विषय असून, याबाबत या पुस्तकातील परेरांच्या दीन 'ए मर्द' या लेखामध्ये दुबईचे राजे शेख महंमद यांना घटस्फोटानंतर जी मोठ्या रकमेची पोटगी द्यावी लागली त्यावर केलेले भाष्य वाचकाला स्वत:शी खळखळून हसायला लावणारे आहे.

अलीकडच्या दोन दशकांतील सामाजिक स्थित्यंतराचा विचार करायचा झाला तर म्हणता येते की, आता सोशल मीडियाचा अतिरेक झाला आहे. या संदर्भातच 'ऑनलाइन समाजसेवक' या लेखात परेरांनी आभासात जगणाऱ्या मंडळींची आपल्या लेखणीतून जी धुलाई केलेली आहे ती निर्विवादपणे अजोड आहे. 'तिसरा पंच'मधील हा लेख म्हणजे समकालीन वास्तवदर्शी विनोदाचा एक महत्त्वाचा दाखला आहे.

राजकीय लोकांचा निगरगट्टपणा सर्वसामान्यांना माहीत असतोच. जो तो राजकारणी अहं ब्रह्मास्मि म्हणूनच जगत असतो. या सर्वांच्या वृत्तीचे दर्शन घडवणारा 'राजीनामाख्यान' हा या पुस्तकातील लेख म्हणजे राजकीय विनोदाचा एक अप्रतिम नमुना आहे.

परेरा त्या लेखात एके ठिकाणी म्हणतात की, ''सगळे पदाधिकारी आपापल्या पदाला आणि खुर्चीला चिटकून राहतात. राजीनामा मागणारे खूप आहेत, पण देत कुणीच नाही. यामुळे मागणी आणि पुरवठा यात कमालीची तफावत निर्माण होऊन राजीनामा या यत्किंचित पदार्थाचा भाव गगनाला भिडला आहे.'' याच लेखात राजीनाम्याचे अनेक प्रकार दिलेले असून, राजकीय राजीनाम्यामागील अनेक संदर्भ अतिशय खुमासदारपणे उलगडले आहेत. हे संदर्भ वाचताना वाचकाला आपल्या अगतिकतेचीही जाणीव होते. विनोदाचे हेच तर सामर्थ्य असते. आजवरच्या मराठी साहित्यातील रूढ विनोदी लेखनाच्या परंपरेत विनोदी लेखकाचे स्वत:चे असे पात्र असावे असे एक मानक आहे. इथे परेराच निवेदक म्हणून सदैव जाणवत असल्यामुळे त्यांना नव्याने पात्र निर्माण करण्याची गरज नाही. स्वत:वरचे विनोद करताना त्यांनी ही ओळख निर्माण करून नवा पायंडा पाडला आहे हे निर्विवादपणे म्हणता येते.

मुखपृष्ठ आणि लेखांच्या विषय–वस्तूला अतिशय समर्पक अशी चित्रे निलेश जाधव यांनी रेखाटलेली आहेत.

'तिसरा पंच', सॅबी परेरा, ग्रंथाली, पाने–१५२, किंमत– २५० रुपये.

( साभार–लोकसत्ता टीम)

# इजरायलचा हिसबुलवर हल्लाबोल

**ज्योतिर्मय साहित्य**

गाझा पट्टीतील युद्धबंदी वरची शाई वाळते न वाळते तोच आता इजरायलने लेबनानमधील हिसबूल या दहशतवादी संघटने विरुद्ध नवी फळी उघडली आहे. आणि अशातच मागील शुक्रवारी इजरायलने लेबनानच्या दक्षिण किनाऱ्यावरील हिसबूलच्या लष्करी तळावर जोरदार हल्ले केले. इस्रायलच्या मोसाव्या संघटनेकडून अशी माहिती मिळाली की लेबनानच्या लूतानी नदी परिसरात हिसबुल लढवय्ये पुन्हा एकत्र येत आहेत. व तेथे ते लष्करी तळ उभे करत आहेत त्यांचा हेतू इजरायल वर पुन्हा हल्ले करणे हा आहे. हे लक्षात घेऊन इजराइलने हिसबुलच्या या पायाभूत सुविधावर जबरदस्त प्रहार केला आहे. विशेषतः या ठिकाणी शस्त्रास्त्रे निर्मिती तसेच युद्धतंत्राचा विकास आणि पुढील हल्ल्याची आखणी व प्रशिक्षण यावर भर दिला जात होता.

**कोण आहे हिसबुल**

१९८२ या वर्षी हिसबुल या संघटनेची स्थापना करण्यात आली लेबनन हे तिचे केंद्र बनले. इजरायलच्या धोक्यापासून लेबनानच्या सीमांचे रक्षण करणे हा या संघटनेचा आरंभी मुख्य हेतू होता. इराणमधील धार्मिक नेते आया तुल्ला खोमिनी यांच्यापासून प्रेरणा घेऊन हिसबुलने आपले कार्य आरंभ केले. १९८५ साली या संघटनेने आपल्यासमोर तीन उद्देश ठेवले होते. पहिला उद्देश म्हणजे लेबनानच्या हिताचे रक्षण करणे, इजराइलचा संपूर्ण विनाश घडविणे आणि लेबनानच्या सुरक्षेसाठी प्रयत्न करणे. या उद्दिष्टावर भर देऊन हिसबुलने इस्रायल विरोधी कारवायात हमासला मदत केली.



लेबनान हा शियाबहुल देश एकेकाळी पर्यटन आणि प्रेक्षणीय स्थळासाठी प्रसिद्ध असलेला हा देश आता युद्ध आणि संघर्षामुळे तणावग्रस्त बनला आहे. आणि तेथील पर्यटन उद्योग पूर्णपणे कोसळला आहे. आता एक वर्षांपूर्वी थांबलेला इजराइल आणि हिजबुल मधील संघर्ष पुन्हा पेटला आहे. वर्षापूर्वी झालेल्या युद्धबंदीनंतर पुन्हा एकदा संघर्षाला तोंड फुटले आहे. **(क्रमशः)**














# जात्यावरच्या ओव्या......

साळवनात डोलते
सोनेरी साळ
जणू भरून झुकते
मोतीयाची माळ ||३२१||

साळीचा केला भात
वर सायीचा थर
बाळ माझ्, तुझ
सांडवला घरभर,, || ३२२||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# रामका गुणगान करिये




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

पं भीमसेन जोशी आणि लता मंगेशकर या दोन भारतरत्नांनी गायिलेले गुणगान करिये रामका हे अतिशय सुंदर गीत. हे गीत ऐकताना जणू समाधी लागते. तशी रामाची कुठलीही गाणी गोडच ! मग ते गीतरामायण असो वा अन्य कुठलीही गाणी. मुळात रामायणच गोड ! पेढ्याचा कुठलाही भाग खाल्ला तरी तो गोडच लागणार ना ! तशीच अवीट गोडीची ही रामकथा. या रामकथेने हजारो वर्षांपासून अनेकांना प्रेरणा दिली. शेकडो लेखक आणि हजारो कवी लिहिते झाले. पण रामकथेची थोरवी संपली का ? वर्णन करून झाली का ? ती कधीच संपणार नाही. रामकथा म्हणजे विविध डोळे दिपविणाऱ्या रत्नांनी भरलेला एक सागर आहे. जेवढी खोल बुडी माराल तेवढी रत्ने हाताला लागतील. समुद्राला आपण रत्नाकर म्हणतो. रामकथा सुद्धा या अर्थाने एक रत्नाकरच !



मी सुरुवातीला उल्लेख केलेल्या गीताचे सुरुवातीचे शब्द आहेत रामका गुणगान करिये. रामाचं गुणगान कशाकरता करायचं ? आणि गुणगान केलं तरी कोणाचं जातं ? ज्याच्यात काही अलौकिक असे गुण आहेत, अशाच व्यक्तीचं आपण गुणगान करतो ना ! आपण रामाचं गुणगान करतो, कृष्णाचं गुणगान करतो, शिवाजी महाराजांचं गुणगान करतो, ते त्यांच्यात विशेष असे अलौकिक गुण आहेत म्हणून. आपण रावणाचं, कंसाचं, औरंगजेबाचं गुणगान करत नाही. आपण आपल्यासमोर असेच आदर्श ठेवतो की ज्यांच्यापासून आपल्याला काही शिकता येईल, प्रेरणा घेता येईल. आजच्या या लेखात प्रभू श्रीरामांचे असेच काही गुण आठवू या. त्या निमित्ताने त्यांचं गुणगान करू या.

सुरुवातीला मला डोळ्यासमोर दिसतो तो, वसिष्ठांच्या आश्रमात शिकणारा राम. राम राजपुत्र असला तरी, आश्रमात तो एक वसिष्ठ ऋषींचा आज्ञाधारक शिष्य म्हणूनच वावरतो. इतर शिष्यांबरोबरच आश्रमातील सगळी कामे करतो, नियम पाळतो. इतर विद्यार्थी जे काही अन्न ग्रहण करतील तेच अन्न तोही ग्रहण करतो. कुठेही राजपुत्र असल्याचा तोरा तो मिरवत नाही. आश्रमातील शिक्षण पूर्ण झाल्यावर निघताना वसिष्ठ ऋषींचा आणि गुरुमातेचा आशीर्वाद घेऊन तो निघतो. त्यावेळी गुरुमातेला तो म्हणतो, या आश्रमात तुम्ही आम्हाला मातेचे प्रेम दिले. मातेची आठवण येऊ दिली नाही. आमची पुत्रवत काळजी घेतली. या आश्रमातील वास्तव्यात माझ्याकडून जर काही चुकलं असेल तर, आपण उदार मनाने मला क्षमा करावी. केवढा हा नम्रपणा !

(क्रमशः)





## दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# देवशोधन

ज्योतिर्मय साहित्य

त्याची शक्ति व साधना ही लहान असतात. केवळ स्वप्रयत्नाने सुक्ष्मत्वाच्या वरच्या पातळीवर जाणे जीवाला अशक्य नसले तरी ते साधेसुधे नसते. तेथे ब्रम्हज्ञानी सद्गुरूची आपल्याला मदत होते. ब्राह्मज्ञानी सद्गुरू आपली ही साधना वर उचलतात.द्रुष्याच्या कक्षेतून सुक्ष्माच्या साम्राज्यात नेतात. त्यामुळे साधकाचा अहंकार दूर होतो. व साधना फलद्रूप होते. समर्थांनी एकुण ३१ ओव्यात हा समास गुंफला आहे. आता आपण प्रत्येक ओवीचा शिस्तशीर पद्धतीने अभ्यास करूया. पहिल्या काही समासात आजच्या द्रुष्टीने कालबाह्य झालेल्या काही गोष्टींचा समावेश केला आहे.. ऊदा, राजे रजवाडे आता नाहीत. पूर्वीच्या काळी गावचा मुख्य सरपंचाचा आधार घ्यावा लागत होता सरपंच सांगेल तसे प्रजेने वागायचं अशी रीत होती. समजा एखाद्या गावात किंवा देशात आपल्याला रहायचे आहे। तेथील सत्ताधीश वरिष्ठ असतो त्याला भेटलो तर आपल्याला इतरांचा त्रास होत नाही. म्हणून ज्याला जिथे रहायचे आहे त्याने वरिष्ठांची भेट घ्यावी. म्हणून राजापासून लंका पर्यन्त सर्वांनी वरिष्ठांची मर्जी संपादन करावी. यावरून समर्थांनी एक सुरेख अनुमान काढले आहे. गावच्या अधिकार्यांना भेटलो नाही हे लक्षात येते की तर गावात धडपणाने राहता येत नाही. तद्वत: ब्रम्हांडनायकाची भेट घेतल्या शिवाय जीवन सुखमय होणे अशक्य होय. राष्ट्राचा अधिपति तो राजा, अनेक राष्ट्रांचा अधिपति तो महाराजा, आणि अशा अनेक महाराजांचा अधिपति तो चक्रवर्ती असतो. कोणी नरपति तर कोणी गजपति असतो, कोणी हयपति तर कोणी भूपति असतो या सर्वांमध्ये चक्रवर्ती हा राजा श्रेष्ठ असतो. (क्रमशः)

# ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री
सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

सुखं त्वं सुखस्यापि मातः प्रदेहि
धनं देहि भक्तिं समाधानमेव।
सदा ते स्वरूपं विलोक्याम्ब मुग्धो
भवामीति भाग्यं महन्मे च मन्ये ।।१२०।।

हे माते, तू सुखाचेही सुख आहेस. मला धन दे. भक्ती दे. समाधान दे. हे अंबे, तुझे स्वरूप पाहून मी सदैव मुग्ध होतो, हे माझे महद् भाग्य मी मानतो.

नेच्छा मम विरामस्य तथापि विरमाम्यहम्।
सलीलपूर्णनेत्राभ्यामम्बे नतोऽस्मि रेणुके।।१२१।।

हे माते, रेणुके, माझी विरामाची इच्छा नाही. तरीही अश्रूपूर्ण नेत्रांनी तुला नमस्कार करून थांबतो.

।। इति श्रीदेवीकृपया चन्द्रहासेन विरचितंश्रीरेणुकाशरणम् ।।

# भगवंताच्या संयोग-वियोगातच खरे सुख दुःख आहे.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

हल्ली लोकांचे हित करण्यासाठी जो तो झटत असतो, पण आपले स्वत:चे हित साधल्याशिवाय दुसऱ्याचे हित आपण काय साधणार? ज्याला स्वत:ला सुधारता येत नाही, तो दुसऱ्याला काय सुधारणार ? त्यालासुद्धा अभिमानच आड येतो, कारण त्याला वाटते, ‘ आपण दुसऱ्याचे हित करून देऊ.’ या अभिमानाने तो फुगलेला असतो. अहंकार जाण्यासाठी साधनच करावे लागते, आणि ते साधन गुरू सांगत असतात. म्हणून, त्यांच्या आज्ञेप्रमाणे वागले म्हणजे आपले हित होते. ब्रह्म हे काही कुठे शोधायला जावे लागत नाही. ते आपल्या जवळच असते; पण ते दुसऱ्याने आपल्याला दाखवावे लागते. हेच काम सद्गुरू करीत असतात. श्रीकृष्ण प्रत्यक्ष परब्रह्म, अवतार घेऊन वसुदेवाचे पोटी आले. परंतु, वसुदेव त्यांना आपला मुलगाच समजत होते तोपर्यंत, प्रत्यक्ष परमात्मा घरी असूनही ओळख पटली नाही. तेच, नारदांनी जेव्हा त्यांना सांगितले की, ‘ श्रीकृष्णाला आपला मुलगा न समजता तो परब्रह्म आहे असे समजा म्हणजे तुमचे हित होईल, ’ तेव्हा खरी ओळख पटली. तसेच, राम अवतारी असूनही, वसिष्ठांनी जेव्हा सांगितले की, ‘ तूच प्रत्यक्ष परब्रह्म आहेस, ’ तेव्हाच त्याला ते ज्ञान झाले. आता हे जरी केवळ आपल्याला दाखविण्याकरिता असले, तरी त्याचा अर्थ हा की, गुरूने दाखविल्याशिवाय तो परमात्मा भेटत नाही. गुरू तरी काय सांगतात ? नामस्मरण हेच साधन म्हणून ते सांगतात. ते दिसायला जितके सोपे तितकेच करायला कठीण असते; ते कठीण आहे म्हणून सोडून देऊ नये. आपण देवाला शरण जाऊन साधन करायला लागावे. म्हणजे ते करायला तो परमात्मा शक्ती देतो.

जगात खरे सुख नाही आणि दुःखही नाही. जगात सुखदुःख आहे असे जे आपल्याला वाटते ते अपुरे आहे; ते तात्पुरते आहे. खरे सुखदुःख भगवंताच्या संयोग-वियोगामध्येच आहे. खरे पाहता आपली बुद्धी लवचिक आहे; आपल्या वृत्तीवर कशाचाही परिणाम होतो. म्हणून आपल्या मागे भगवंताचा आधार हवा. आपण त्याचे आहोत, आणि जे जे होते ते त्याच्या इच्छेने होते, असे समजून वागावे. भूक लागली तर आईजवळ खायला मागावे, पण चोरी करू नये; तसे पोटापुरते भगवंताजवळ मागावे, पण जास्त मागू नये. भगवंत अत्यंत जवळ आहे आणि अत्यंत दूरही आहे. तसाच तो सर्वव्यापी आहे. म्हणून तो आपल्याला दिसत नाही. आपण दरवर्षी भगवंताचा जन्म करतो; याचा अर्थ असा की, मागच्या वर्षी आपण जन्म केला हे विसरलो, म्हणून या वर्षी पुन: त्याचा जन्म करावा लागला ! खरे म्हणजे भगवंताचा वाढदिवस करायला पाहिजे. भगवंत काल होता, आज आहे, आणि उद्या राहणारच; म्हणून त्याचा खरा वाढदिवस होऊ शकतो. भगवंताचे अस्तित्व आपण जागृत ठेवले, तर दरवर्षी जास्त उत्साह वाढेल आणि आनंदाचा वाढदिवस होईल.

रामनाम जाणा अक्षरे दोन । गुरूमुखे करावी ओळखण ।।



# शाळेची मज्जा...

अंकुश शिंगाडे,
नागपूर

## भटकंती...

ज्योतिर्मय साहित्य

आज कॉन्व्हेंटच्या शिक्षणाबद्दल लोकांच्या मनात आस्था आहे. ती आस्था आज मराठी माध्यमाच्या शाळेतील शिक्षणाबाबत दिसत नाही. ती निर्माण व्हावी म्हणून सरकार प्रयत्नशील आहे. परंतु सरकार कितीही प्रयत्नशील असलं तरी आज तशी मराठी माध्यमाच्या शाळेची पटसंख्या वाढवणं शक्य नाही. कारण आज मराठी माध्यमातून शिकविण्याची पालकांमध्ये मानसिकता उरलेली नाही. त्याचंही कारण आहे. ते म्हणजे देशात मराठीतून होत असलेला वा चालत असलेला व्यवहार वा जगात चाललेला व्यवहार. आज जगात मराठीतून व्यवहार चालत नाही. तसाच हा मराठीतील व्यवहार देशात वा जगातही चालत नाही तर हा व्यवहार इंग्रजीतून चालत आहे.

महत्वपुर्ण गोष्ट ही की आज हा व्यवहार पाहता जरी लोकांची मानसिकता मराठी माध्यमातून आपल्या मुलांना शिकविण्याची नसेल तरी शासनानं निराश होवू नये. त्यांनी असे काही उपक्रम राबवावेत की लोकं आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमातून शिकवणार. नाही तर त्यांना मराठी माध्यमाच्या शाळेत टाकतील. निव्वळ मोफत गणवेश देवून वा मोफत पुस्तके वाटप करुन मराठी शाळेतील मुलं वाढणार नाहीत. हे तेवढंच खरं आहे.

महत्वपुर्ण गोष्ट सांगायची म्हणजे माझी शासनाला नम्र विनंती राहिल की त्यांनी संबंधीत वस्तू विद्यार्थ्यांना फुकटात देवू नये. मग तो गणवेश वाटप का असेना वा पुस्तक वाटप का असेना, कारण फुकटात मिळणा-या वस्तूंना मोल नसतं. तसंच पालकांनीही कोणत्याही वस्तू आपल्या पाल्यांना शिकवतांना फुकटात मागू नयेत. कारण फुकटात मिळणा-या वस्तू खरं सांगायचं म्हणजे पचवता येत नाहीत. आज तेच होवून राहिले. ज्या कॉन्व्हेंटमध्ये पैसा भरुन शिकवलं जातं. तिथं विद्यार्थ्यांची भरभराट आहे आणि ज्या मराठी शाळेत असा पैसा लावून शिकवलं जात नाही. तिथं मात्र विद्यार्थ्यांची वानवा आहे हेही तेवढंच खरं आहे. म्हणून शिक्षणाला महत्त्व यावं म्हणून शिक्षण निःशुल्क नसावं. आजच्या काळात काही ना काही शिक्षणाला शुल्क असावं. मगच पुस्तके वा गणवेश वाटप करावीत. मग त्या शाळा मराठी माध्यमाच्या का असेना.

दप्तराचे ओझे

शाळेचा पहिला दिवस होता.पावसाची सर येवून गेली होती. अस्तावलेलं मन आता थोडं शांत झालं होतं. तशा जमीनीला पडलेल्या भेगाही आज दिसत नव्हत्या. अशातच सुमंत आपल्या शेतात वखरानांगराची कामे करीत होता. शेती पिकत जरी नसली तरी ती शेती पिकविण्यासाठी तो काबाड मेहनत करीत होता.

सुमंतला एक मुलगीही होती. चारुशिला नाव होतं तिचं.ती त्या काबाडकष्ट करणाऱ्या माणसाची मुलगी असली तरी ती शरीरानं धडधाकट नव्हती.ती अत्यंत नाजूक होती.

चारुशिला नाजूक होती. ती आता चौथीत गेली होती. काँन्व्हेटचं प्रस्थ असल्याने सुमंतनेही तिचे नाव काँन्व्हेंटमध्ये टाकले होते.

(क्रमशः)




ज्योतिर्मय साहित्य

मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील राक्षसभुवन या ऐतिहासिक क्षेत्रात अनेक महत्त्वाच्या घटना घडल्या आहेत. निजाम व पेशवे यांच्यांतील लढाई येथेच होऊन साडेतीन शहाण्यांपैकी एक विठ्ठल सुंदर मारला गेला. पौराणिक दृष्टीने हे स्थान महत्त्वाचे आहे. राक्षसभुवन हे दत्तप्रभूंचे आदिपीठ मानले जाते. प्रभु रामचंद्र यांना अत्री ऋषींच्या आश्रमातून याच गावी दत्तात्रयांचे दर्शन झाले होते. ‘रक्षोभुवन माहात्म्य’ नावाच्या संस्कृत ग्रंथात येथील शनीचे महत्त्व वर्णन केले आहे. येथे गौतम, अगस्ती, अत्री, दधीची इत्यादी ऋषींनी निवास केला होता. येथील आत्मतीर्थावर अत्री ऋषींनी अनुष्ठान केले होते. येथेच ब्रह्मा, विष्णु, महेश हे देव अतिथींच्या रुपाने आले. यांनी अनसूयेच्या सत्त्वहरणाचा प्रयत्न केला.

अत्री ऋषींच्या आश्रमाजवळ वरद दत्तमंदिर आहे. जवळच दधीची ऋषींचे दादेश्वर नावाचे महादेवाचे मंदिर आहे. येथेच दासोपंतांना दत्तात्रयांची कृपा झाली. त्यांनी राक्षसभुवन येथे बरेच दिवस अनुष्ठान केले. वरददत्तमंदिराची रचना आश्रमासारखी आहे. मंदिरावर शिखर नाही. दत्तस्वामींनी स्थापना केलेल्या दत्तमूर्तीची ख्याती एकमुखी व षड्भुज अशी आहे. दत्तात्रयांचा तिसरा अवतार म्हणजे दत्तस्वामी मानले जातात. ‘दत्तलीला गुरुचरित्र’ हा ग्रंथ केशव उर्फ बाबास्वामी यांनी लिहिला आहे. दत्तनाथ उज्नैनीकर हे याच मठाच्या परंपरेतील होते. बा. न. मुंडी यांनी दत्तनाथ उज्जैनीकर (ढोली बुवा) यांचे साहित्य व चरित्र लिहिले आहे. एकनाथ महाराजांपासून येथे आजपर्यंत नाथषष्ठी व दत्तजयंती हे उत्सव सुरू आहेत.

श्री क्षेत्र राक्षसभुवन दत्तात्रेयांचे
आद्यपीठ वरददत्त संस्थान

राक्षसभुवन महाराष्ट्राच्या बीड जिल्ह्यात गोदावरीकाठी गेवराई तालुक्यात वसलेले गाव आहे. येथील शनिमंदिर महाराष्ट्रभर प्रसिद्ध आहे. या तीर्थक्षेत्री शनिदेवाचे प्रथम पीठ प्रसिद्ध आहेच, १७६३ मध्ये येथे झालेल्या लढाईत थोरल्या माधवराव पेशव्यांनी निजामाचा दारुण पराभव केला.

(क्रमशः)




# कॅल्शियमची कमतरता

ज्योतिर्मय साहित्य

शरीरातील कॅल्शियम हे विटामिन डी. थायराइड ,हार्मोन्स आणि कॅल्सीटोनील याद्वारे नियंत्रित केले जाते. त्यामुळे शरीरातील व रक्ताची कॅल्शियमचे प्रमाण नेहमी योग्य राहते विटामिन डी आतड्यातील व किडनीतील कॅल्शियम रक्तामध्ये शोषून घेण्यासाठी मदत करते. आपल्या शरीराला विटामिन डी ही कोवळ्या सूर्यप्रकाशातून मिळत असते .विटामिन डी च्या कमतरतेमुळे हाडातील कॅल्शियम कमी होऊन हाडे ठिसूळ होतात. याशिवाय आहारातून कॅल्शियम युक्त पदार्थांचे सेवन न करणे, पचनशक्ती मंदावणे यामुळे आहारातील कॅल्शियमची शोषण कमी होते तसेच स्त्रियांना मासिक पाळीत अतिरिक्त स्त्राव होणे, स्त्रियांची मासिक पाळी येणे बंद झाल्यानंतर हार्मोनचे संतुलन बिघडणे व ऊन आणि शारीरिक श्रमांचा अभाव, गोड पदार्थांची अति सेवन करणे ,नवजात बालकांना मातेचे दूध न मिळणे यामुळे देखील कॅल्शियमची कमतरता निर्माण होते .प्रत्येक स्त्रीमध्ये मासिक पाळी बंद झाल्यानंतर शरीरातील हार्मोन्सची संतुलन बिघडल्याने संपूर्ण शरीरातील हाडे ठिसूळ लागतात. या दिवसांमध्ये फक्त आहारातून कॅल्शियम घेऊन पूर्तता शकत नाही त्यासाठी आयुर्वेदिक कॅल्शियमची औषधे घेणे गरजेचे असते अन्यथा स्त्रियांच्या शरीरातील हाडे ठिसूळ होऊन थोडाश्या आघाताने देखील भग्न होऊ शकतात .

अनेक स्त्रियांना हाता पायांना मुंग्या येणे, मणक्याचे विकार उद्भवणे,मान व कंबर दुखणे, सकाळी उठताना त्रास होणे, चालताना त्रास होणे ,मांडी घालून जास्त वेळ बसू न शकणे. शौचाला बसता न येणे ,चक्कर येणे, गुडघेदुखी ,लवकर थकवा येणे ,दात दुखणे, नखे ठिसूळ झाल्याने तुटणे, केस गळणे, सतत भीती वाटणे, ताण तणाव जाणवणे ,स्मरणशक्ती कमी होणे व झोप न लागणे अशा अनेक प्रकारच्या त्रासांना तोंड द्यावे लागते तथापि बहुतांश स्त्रियां त्याकडे दुर्लक्ष करतात त्यामुळे त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात .

स्त्रियांनी वयाच्या पन्नाशीनंतर आहारात कॅल्शियम पदार्थांचे प्रमाण वाढवावे.त्यासाठी कँल्शियम युक्त आहाराचे सेवन करावे.पुढील पदार्थ हे कँल्शियमयुक्त असतात. त्यांचा आहारात समावेश करावा.

गहू, बाजरी ,नाचणी, दूध व दुधाचे सर्व पदार्थ, मुगडाळ ,सोयाबीन, वाटाणे, मटकी, राजमा, कढीपत्ता, कोबी, मेथी, मुळ्याची पाने, पुदिना, कोथिंबीर ,काकडी, गवार ,टोमॅटो, मनुका, बदाम, पिस्ते, अक्रोड, खरबुजाच्या बिया, नारळ, आंबा, सिताफळ, संत्रा ,अननस ,ओवा ,जिरे, हिंग, लवंग, व काळे मिरे या पदार्थांचा आहारात समावेश असावा.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

कँल्शियम वाढण्यासाठी घरगुती उपाय

सकाळी एक ग्लास ताज्या ऊसाच्या रसामध्ये एक गुंज चुना टाकून प्यावा.

जेवणानंतर नागवेलीचे ( खायचे )पान व चुना खावा.

रात्री झोपण्यापूर्वी ऊक ग्लास दूधात गूळ टाकून प्यावा.

सुरमई माशाचे सेवन करावे.

बदाम ,सुके अंजीराचे सेवन करावे.

आहारात भेंडीच्या भाजीचे सेवन जास्त करावे.

स्वयंपाकात तीळ तेलाचा वापर करावा.

रोज आवळ्याचे सेवन करावे

एक ग्लास पाण्यात एक चमचा जिरे टाकून उकळून घ्यावे व थंड झाल्यावर सकाळी व सायंकाळी प्यावे.

बाभळीच्या बियांचे सूक्ष्म चूर्ण तूप व मधासोबत घ्यावे.

बाभळीच्या डिंकाचे चूर्ण तूप साखरेसोबत घ्यावे.

एक कप दूधात एक चमचा बडिसोप टाकून दूध उकळुन घेऊन त्यामध्ये एक चमचा बाभळीच्या डिंकाचे चूर्ण टाकून ढवळून थंड झाल्यावर घ्यावे.

वयाच्या पन्नाशी नंतर स्त्रियांना तसेच पुरुषांना देखील कँल्शियम ची कमतरता असतेच. तथापि त्याकडे दुर्लक्ष करणे खूपच नुकसान दायक ठरू शकते. तेव्हा पन्नाशी नंतर प्रत्येक व्यक्ती ने त्यासाठी आयुर्वेद तज्ञांच्या सल्ल्याने औषधोपचार घेतल्यास व्रुध्दत्व सुखकर होते हे नक्कीच.

# डॉ होमी जहांगीर भाभा

**ज्योतिर्मय साहित्य**

भारताच्या आण्विक शक्तीचे जनक असे ज्यांना म्हटले जाते त्या डॉ होमी जहांगीर भाभा यांचा आज जन्मदिन. स्वतंत्र भारताला समर्थ आणि बलवान बनवण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी जीवाचे रान केले त्यात डॉ होमी जहांगीर भाभा याचे नाव आवर्जून घेतले जाते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणू आणि अवकाश क्षेत्रात जे कार्य केले त्यामुळे जगभर भारताचे नाव झाले. डॉ होमी जहांगीर भाभा यांचा जन्म सदन पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉ जहांगीर भाभा हे बॅरिस्टर होते. त्यांच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती त्यामुळे त्यांनी खूप पुस्तके गोळा केली होती त्यात विज्ञान या विषयाचीही पुस्तके होती. डॉ होमी यांना लहानपणापासून विज्ञानाची आवड होती. त्यामुळे त्यांनी विज्ञानाची अनेक पुस्तके वाचून काढली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर होमी यांनी इंजिनिअर व्हावे असे त्यांचा वडिलांना वाटत होते पण होमी यांनी आपल्याला गणित आणि पदार्थ विज्ञान हे विषय आवडतात आणि त्यातच आपण करियर करणार असे वडिलांना ठामपणे सांगीतले. वडिलांनी त्यांना या विषयात करियर करण्यास परवानगी दिली पण आधी इंजिनिअरिंग पूर्ण करण्याची अट घातली.



त्यामुळे होमी यांनी १९३० साली केम्ब्रिज विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत इंजिनिअरिंग पूर्ण केले. तसेच पॉल डिरेक यांच्या मार्गदर्शनाखाली गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयांचा अभ्यासही केला. गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयात त्यांना खूप गती होती त्यामुळे या विषयात त्यांनी अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्या मिळवल्या. १९४० साली ते भारतात परत आले. भारतात आल्यावर त्यांनी बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले. १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. पुढे याच संस्थेचे ते संचालक बनले. संचालक असतानाही त्यांनी आपले संशोधन कार्य सोडले नाही. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने भारत सरकारने अणू ऊर्जा आयोगाची स्थापना केली. या संस्थेचेही ते संचालक होते. या संस्थेत त्यांनी आपल्या संशोधनाला सुरुवात केली, तेंव्हा मुल कण, नवे सिद्धांत, नवे तंत्रे उदयास आली होती. त्यात डॉ होमी भाभा यांनी मोलाची भर टाकली. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने अणुऊर्जा विकासासाठी स्वतंत्र खातं निर्माण केले त्यावेळी या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ होमी भाभा यांचीच निवड करण्यात आली. या अणुऊर्जा विकास संशोधन खात्याने मुंबईत तुर्भे येथे देशातील पहिले अणू विषयक संशोधन करणारं केंद्र डॉ भाभा यांच्याच नेतृत्वाखाली उभे केले. त्यानंतर १९५६ साली देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिली अणुभट्टी सुरु करण्यात आली. अणुविषयक व आंतरीक्ष विषयक अशा दोन्हीही क्षेत्रात महत्वपूर्ण आणि भक्कम पाया घालण्याचं श्रेय हे डॉ होमी जहांगीर भाभा यानांच जाते. अणुशक्तीचा वापर विघातक कामासाठी नव्हे विधायक कामासाठी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. १९५५ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या आणि संयुक्त राष्ट्र संघामार्फत आयोजित अणुऊर्जेचा वापर शांततामय विकासकार्यासाठी वापर या विषयाच्या परिसंवादाचे डॉ भाभा हे अध्यक्ष होते. या परिसंवादात त्यांनी अणुऊर्जेचा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी न करण्याचे आव्हान सर्व देशांना केले होते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणुऊर्जा आणि आंतरीक्ष क्षेत्रात जे महान कार्य केले त्यामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवले. २४ जानेवारी १९६६ रोजी स्वित्झर्लंड मधल्या माँ ब्लँ या उंच शिखरावर झालेल्या भीषण अपघातात या महान शास्त्रज्ञाचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर तुर्भे येथील अणू संशोधन केंद्राचे नाव बदलून भाभा अणुसंशोधन केंद्र असे करण्यात आले. आज त्यांच्या जन्मदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

# अभिज्ञान, पुणे आयोजित ''भगवत्स्तोत्र परिचय कार्यशाळा''

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – भारतीय आध्यात्मिक वारसा आणि संस्कृत स्तोत्रांच्या माधुर्याचा प्रसार घडविण्यासाठी 'अभिज्ञान, पुणे' तर्फे ''भगवत्स्तो-स्तोत्र परिचय कार्यशाळा'' दिनांक २ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे. कार्तिक एकादशीनिमित्त होणाऱ्या या ऑनलाईन कार्यशाळेत भगवान श्रीविष्णूंच्या विविध रसाळ स्तोत्रांचा वेल्हाळ परिचय करून देण्यात येणार आहे.

या कार्यशाळेचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे ती फक्त थेट प्रक्षेपण (यूट्यूब लाईव्ह) स्वरूपात असेल; नंतरचे रेकॉर्डिंग उपलब्ध राहणार नाही. त्यामुळे श्रोत्यांनी त्या दिवशीच सहभागी होऊन आध्यात्मिक अनुभवाचा लाभ घ्यावा, असे आयोजकांनी आवाहन केले आहे.

कार्यशाळेचे निरूपण प्रसिद्ध वक्ते आणि अभ्यासक डॉ. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर करणार असून, त्यांच्या सुलभ आणि रसाळ भाष्यशैलीतून भगवानश्रीविष्णूंच्या स्तोत्रांतील अर्थ, भाव, आणि तत्त्वज्ञान यांचे दर्शन घडवले जाईल.

माध्यमः , दिनांकः २ नोव्हेंबर २०२५, वेळः दुपारी ३.०० ते ५.०० लिंकः https://www.youtube.com/@manasimaitreyi

या कार्यशाळेचे एक वेगळे वैशिष्ट्य म्हणजे शुल्क पूर्णपणे ऐच्छिक ठेवण्यात आले आहे. ''कार्यशाळेनंतर, शुल्क देणे ऐच्छिक आहे, अनिवार्य नाही.'' या भावनेतून ही योजना राबवण्यात आली आहे.



आयोजकांनी सांगितले की, ''अभिज्ञान, पुणे'' या संस्थेमार्फत अध्यात्म, संस्कृत, आणि भारतीय ज्ञानपरंपरेवरील विषयांवर नियमित ऑनलाइन उपक्रम राबवले जातात. या निमित्ताने रसिक भक्तांनी चॅनेल '' सबस्क्राईब करून भविष्यातील कार्यक्रमांची माहिती घेता येईल.

व्हाट्सॲप संपर्क.: ७२४९१२२४२८ / ९८५००७४४१८



# युवा आशियाई कबड्डी स्पर्धेत सुवर्णपदक विजेती सेरेना म्हसकरचा जिल्हाधिकारी यांच्या हस्ते गौरव

**ज्योतिर्मय साहित्य**

**मुंबई** – तिसऱ्या युवा आशियाई कबड्डी स्पर्धेत भारताला सुवर्णपदक मिळवून देणाऱ्या भारतीय संघातील सेरेना सचिन म्हसकर हिचा विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि जिल्हाधिकारी सौरभ कटियार (मुंबई उपनगर) यांच्या हस्ते सन्मानपत्र आणि गौरवचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

जिल्हा क्रीड़ा अधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर कार्यालयात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी जिल्हाधिकारी कटियार यांनी भविष्यात सेरेनाला तिच्या क्रीडा जीवनासाठी आवश्यक ती सर्व मदत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात येईल अशी ग्वाही दिली.

सेरेना सोबत तिचे प्रशिक्षक अमित ताम्हणकर, आई श्रीमती मेघाली म्हसकर (शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त) आणि वडील सचिन म्हसकर (आंतरराष्ट्रीय रग्बी खेळाडू) उपस्थित होते.

कार्यक्रमास जिल्हा क्रीडा अधिकारी रश्मी आंबेडकर व क्रीडा कार्यकारी अधिकारी प्रीती टेमघरे उपस्थित होत्या.

# ''जागतिक शैवाल दिना'' निमित्त डॉ. प्रकाश पापडीवाल यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – जागतीक शैवाल दिनाचे औचित्य साधून ''अल्गल डायव्हर्सिटी ॲट जायकवाडी बर्ड सॅक्चुअरी'' या प्रा. डॉ. प्रकाश पापडीवाल लिखित शैवाल वर्गीय वनस्पतीच्या संशोधनावर आधारित पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. हा प्रकाशन सोहळा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आला. या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर चे माजी कुलगुरू प्रा. डॉ. विजय पांढरीपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर च्या वनस्पतीशास्त्र विभागाचे विभागप्रमुख वरीष्ठ प्रा. डॉ. अरविंद धाबे उपस्थित होते. या प्रकाशन सोहळ्यासाठी शिक्षण व संशोधन क्षेत्रातील मान्यवर विविध राज्यातून ऑनलाईन पद्धतीने उपस्थित होते.




या पुस्तकाचे प्रकाशन करताना डॉ. विजय पांढरीपांडे यांनी वयाच्या ७५ व्या वर्षी डॉ. पापडीवाल यांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकाबद्दल सविस्तर विवेचन करून कौतुक केले. सेवेतून वयोमानानुसार निवृत्त झाले तरीसुद्धा संशोधनातून निवृत्त न होता या पद्धतीने सर्वांनीच संशोधन क्षेत्रामध्ये आपले बहुमूल्य योगदान द्यावे या शब्दात डॉ. पापडीवाल यांच्या संशोधन कार्याचा गौरव केला. याप्रसंगी त्यांनी आजच्या संशोधन क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले व नव संशोधकांना उत्कृष्ठ संशोधनाबद्दल मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. अरविंद धाबे यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात शैवाल वर्गीय वनस्पतींचे वनस्पती शास्त्रातील महत्त्व विशद करून शैवाल वर्गीय वनस्पतीं बाबत संशोधन करताना येणाऱ्या अडचणी सांगून या क्षेत्रातील संशोधनाचे महत्त्व सविस्तर सांगितले. याप्रसंगी लेखक प्रा. डॉ. पापडीवाल यांनी आपल्या मनोगतामध्ये मागील ३५ वर्षापासून शैवाल वर्गीय वनस्पती बाबत संशोधन करत असल्याबाबत नमूद करत या संशोधनात संशोधक विद्यार्थी व सहकारी प्राध्यापकांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या सोहळ्यात महाराष्ट्र तंत्रज्ञान संस्थेचे कुलसचिव डॉ. बाबासाहेब सोनवणे यांनी पुस्तकाचे लेखक डॉ. पापडीवाल व प्रमुख पाहुणे माजी कुलगुरू प्रा. डॉ. विजय पांढरीपांडे त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख मांडून ओळख करून दिली.

या ऑनलाईन पुस्तक प्रकाशन सोहळ्यासाठी सेवानिवृत्त प्राध्यापक संघटनेचे सचिव तथा माजी प्राचार्य प्रा. डॉ. जयनारायण मंत्री, मध्यप्रदेशातील सतना येथील प्राचार्य शिवेश प्रताप सिंग, वरीष्ठ संशोधक डॉ. रश्मी सिंग, राजस्थान राज्यातून उदयपूर येथील मोहनलाल सुखाडीया विद्यापीठाचे माजी वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. नरेशचंद्र ऐरी, माजी पोलीस उपायुक्त श्री. खुशालचंद बाहेती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर च्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. डॉ. रवीकरण सावंत, सुप्रसिद्ध शल्यचिकित्सक डॉ. पुरुषोत्तम दरख, श्री मुक्तानंद महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. रामराव चव्हाण, प्रा. डॉ. अनिल मुंगीकर, पुणे विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. मिलिंद सरदेसाई, सुप्रसिद्ध वकील श्रीमती मधुबाला गंगवाल, डॉ. वर्षा पवार, सौ. लता पापडीवाल, धुळे येथून डॉ. लक्ष्मण शिंपले इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब पवार यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. शिवाजी आंधळे यांनी मानले.







# साताऱ्याचा ग्रंथमहोत्सव

**ज्योतिर्मय साहित्य**
**(मागील अंकावरून)**

दत्तात्रेय पाष्टे सांगतात... वेगवेगळ्या प्रकारचे कोश हा भाषेचा मुलभूत ठेवा आणि भाषेचा आरसा आहेत. मराठीपुरते बोलायचे, तर कलकत्त्याजवळ श्रीरामपूर येथे १८०५ साली 'विल्यम कॅरे' याने देवनागरी मुद्राक्षरे वापरून पहिले पुस्तक छापले. याच कॅरेने १८१० साली अ डिक्शनरी ऑफ मराठा लँग्वेज हा मराठीतला पहिला मुद्रित कोश तयार केला. या कोशात सुमारे दहा हजार मराठी शब्दांचे इंग्लिश अर्थ दिलेले आहेत. मी जेव्हा १९८६ पासून गावोगावी जाऊन शैक्षणिक पुस्तके आणि कोशवाङ्मय विकत होतो त्यावेळीपासून माझ्या मनात होते कि, कोशवाड:मय आपण मराठीमध्ये का करू शकत नाही? २००५ साली डायमंड प्रकाशन संस्था सुरू केल्यावर मी हा कोश प्रकल्प हातात घेतला. सुरवातीला बी.आर जोशीचे राज्यशास्त्र, इतिहास, विधिशास्त्र असे पाच कोश काढले. त्यानंतर य.न. केळकरांचा ऐतिहासिक शब्दकोश हक्क मिळवून नव्याने काढला. त्यानंतर क्रीडाकोश, भारतीय सरिताकोश काढला.तीन खंडांमधला सामाजिक ज्ञानकोश, वाणिज्यकोष, शिक्षणशास्त्रकोश त्याचबरोबर ज्येष्ठ भाषातज्ञ सत्वशीला सामंत लिखित शब्दानंद सारखा आगळावेगळा त्रैभाषिककोश तसेच नेहमीपेक्षा वेगळा विचार देणारा संत सुभाषित कोश ही 'डायमंडने' काढला. ४० वर्षाच्या अनुभवाने स्वतःच व इतरांना ट्रेन करीत या कोशवाड:मयाची प्रचंड विक्री आम्ही केली आहे. या कोशांची उपयुक्तता तुम्हाला सांगता आली पाहिजे. म्हणजे वाणिज्य शाखेच्या माणसालासुध्दा शिक्षणशास्त्राच्या कोशाची जरूरी असते. या कोशांमधला मगज किती ताकदीचा आहे हे तुम्हाला उकलून सांगता आले पाहिजे. नुकताच आम्ही डॉ. महेंद्र भवरे संपादित फुले-आंबेडकरी' वाड:मयकोश प्रकाशित केला आहे. याशिवाय माझ्या डोक्यात 'दहशतवादाचा कोश' आणि 'मानवी हक्क' या विषयाचा कोश काढण्याचे घोळत आहे. कारण हे दोन्ही विषय न संपणारे असून या विषयांना खूप कंगोरे आहेत आणि या विषयावर मराठीमध्ये फार संदर्भग्रंथ नाहीत. आज आपण भारतांमधील विविध भाषांमध्ये विशेषतः दक्षिणेकडे जेव्हा मेडिकल, इंजिनीअर आणि विविध कोर्सेसची पुस्तके त्यांच्या त्यांच्या मातृभाषेत बघतो तेव्हा आपल्या मराठी भाषेमध्ये सर्व अभ्यासक्रमाची पुस्तके मातृभाषेत असलीच पाहिजेत अशी माझी भावना आहे. कारण मातृभाषेत जे आपणाला सहज कळतं, उमगत आणि आपण परिपूर्ण होतो ते दुसऱ्या भाषेत असेल तर समजण्यास कठीण जाते.



१९७२ साली पुण्यातील नामवंत 'राका बुक एजन्सी' येथे ११ वी ची परीक्षा संपल्या बरोबर पाष्टे कामाला लागले. ५ मजली इमारतीमध्ये असलेल्या पुस्तकातून मागेल ते पुस्तक ग्राहकाला देत असत. एव्हडा परिपूर्ण अभ्यास त्यांचा इंग्रजी कच्चे असूनही झाला होता. १९७७ पर्यंत तेथे नोकरी केल्या नंतर मात्र पुण्यातील नामवंत स.प. महाविद्यालय येथे त्यांना नोकरी लागली.नोकरी लागल्यानंतर रिकामे वेळी ते पुस्तकांच्या दुकानात काम करत होते. १९८६ साली त्यांनी कॉलेजची नोकरी सोडून स्वतःचे पुस्तकाचे दुकान चालू करण्याचा धाडसी निर्णय घेतला.कारण पुस्तकावर त्यांचे फार प्रेम व आवडता व्यवसाय चालू करावे असे त्यांना वाटले. प्राचर्यांनी मात्र पेन्शनची नोकरी राजीनामा देऊन सोडू नकोस, कारण व्यवसाय करणे फार अवघड आहे. तुझे लग्न झाले आहे मुले आहेत.शिक्षण व पैसे सुद्धा तुझ्याकडे कमी आहेत. तु एक वर्ष मेडिकल रजा घे आणि तुला व्यवसाय जमल्यास राजीनामा दे असा सल्ला दिला. त्याप्रमाणे एक वर्षात पाष्टे यांनी चांगला व्यवसाय केला व त्यात त्यांना लाखभर रुपये मिळाले. जे वर्षभराच्या पगाराच्या कित्येक पटीने जास्त होते. प्राचार्यांनी हे बघून राजीनामा मंजूर केला.



शिरीष चिटणीस
सातारा मो. 75888 65051

१९८६ साली 'डायमंड बुक सेंटर' सुरू केले आणि सुरवातीला इंग्रजी माध्यमांची उच्च शिक्षणाची पुस्तके-ग्रंथ विकण्यास पाष्टे यांनी सुरू केले. त्यात प्रकाशन संस्थांचे नामवंत प्रकाशक ऑक्सफर्ड, केम्ब्रिज या प्रकाशन बरोबर व इतर तसेच दिल्लीमधील नामवंत प्रकाशकांचे वितरण त्यांनी सुरू केले. शहर व ग्रामीण भागातील महाविद्यालयात जाऊन ग्रंथ विकणे सुरू केले.हे चांगल्या प्रकारे वितरण करत डायमंड पब्लिकेशन ही प्रकाशन संस्था पाष्टे यांनी सुरू केली.महाराष्ट्र राज्य विश्वकोशामध्ये तीन वर्षे सल्लागार म्हणून पाष्टे यांनी काम केले. खंड २२ मधील खंडामध्ये संपादकामध्ये पाष्टे यांचे नाव आहे. माननीय राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील ह्यांनी पाष्टे यांनी प्रकाशित केलेल्या शब्दकोशाबद्दल कौतुक केले. आज पर्यन्त ११५० पेक्षा जास्त पुस्तकें पाष्टे यांनी प्रकाशित केली आहेत. त्यांचा ग्रंथाबरोबरचा सहवास आणि प्रवास तरुणाईला आदर्शवत असा आहे. वाचनानं माणूस घडतो. समाजात नाव कमाउन गेलेल्या अनेक मोठ्या माणसांनी वाचन केल्यामुळेच ते ज्ञानी झाले. संस्कृत भाषेत एक सुभाषित आहे

'वाचनं ज्ञानदं बाल्ये तारुण्ये शीलरक्षकम्। वार्धक्ये दुःखहरणं हितं सद्ग्रन्थवाचनम् ।।

याचा अर्थ असा आहे की, चांगले वाचन बालपणी ज्ञान देते, तारुण्यात चारित्र्याचे रक्षण करते आणि वृद्धपणी दुःखे दूर करते. म्हणजेच वाचन सगळ्यांसाठी हितकारक आहे.'' अशा या वाचन संस्कृती समृद्ध करणाऱ्या आणि मराठी भाषेच्या समृद्धीसाठी प्रचंड अभ्यासपूर्ण योगदान देण्याऱ्या 'दत्तात्रेय पाष्टे' यांचा प्रवास थक्क करणारा आणि आनंददायी आहे.

# ।। आजानुबाहू श्री शंकर महाराज.....।।

ज्योतिर्मय साहित्य

मै कैलास का रहनेवाला, मेरा नाम है शंकर ।
दुनिया को समझाने आया, करले कुछ अपना घर ।।
यहां दुनिया मे कोई रंग है, यह रंग निराला है ।
पाया न भेद किसने, यह गहरा ही गहरा है ।।

हे शंकर महाराजांचे शब्द आहेत.

अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराज यांना शंकर महाराज गुरुस्थानी मानत. ते भक्तांना स्वामींचा जप करावयास लावत. सोलापूर येथील शुभराय मठात, त्र्यंबकेश्वर येथील रामभाऊ उर्फ रामचंद्र अकोलकर यांचे घर, अहमदनगर येथील डॉक्टर धनेश्वर, बालगंधर्व, प्र.के. अत्रे, असे अनेक प्रसिद्ध व्यक्ती शंकर महाराजांचे भक्त होते. त्या भक्त परिवारातील अनेकांनी शंकर महाराज यांच्या बद्दल आपल्या आठवणी लिहून ठेवलेल्या आहेत. तसेच त्यांच्या कार्यकाळासंदर्भात पण काही आक्षेप आहेत. त्याचे पण काही दाखले काही नमूद केले आहे.

पुण्याच्या डेक्कन कॉलेज मध्ये असणाऱ्या प्रोफेसर भालचंद्र देवांना महाराजाच्या वया विषयी कुतूहल होते. एक दिवस धीर करून त्यांनी महाराजांना प्रश्न विचारलाच ''महाराज! आपले वय काय असेल हो?'' तेव्हा महाराज उत्तरले ''अंदाजे १५० वर्षे. मी शनिवारवाडयात पेशव्यांबरोबर पंगतीला बसलो आहे'' ही घटना साधारण १९३५ ची आहे म्हणजे महारांजानी जेव्हा महासमाधी (१९४७) घेतली त्या वेळेस ते १६२ वर्षांचे होते. पुण्याच्या डॉक्टर धनेश्वर ह्यांना असेच महाराजांच्या वयाबद्दल संदेह होता. त्यांनी महाराजांची परवानगी घेऊन त्यांच्या काही मेडिकल टेस्ट करून घेतल्या. त्या टेस्टचा रिझल्ट आल्यावर डॉक्टराना अंधारी आली.. रिझल्ट मध्ये महाराजांचे वय १५२ वर्षे आले. कार्तिक शुद्ध अष्टमी हा शंकर महाराजाचा प्रकट दिन म्हणून साजरा होतो. यावर्षी ३० ऑक्टोबर गुरुवार रोजी महाराजांचा प्रकट दिन साजरा होत आहे. धार्मिक. अध्यात्मिक कार्यक्रम, गायन, आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर यांचे आयोजन केले जाते.

वैशाख शुद्ध अष्टमी २४ एप्रिल १९४७ रोजी पुणे येथील धनकवडी पद्मावती येथे समाधी. महाराजांविषयी ची माहिती आपण जाणून घेऊया. सद्गुरु शंकर महाराज यांच्या शंकर गीता व शंकर बावनी या दोन पुस्तकात महाराजांचे लीला वर्णन आले आहे. त्यातूनच आपल्याला शंकर महाराजांन विषयी बरीच माहिती मिळते. तसेच शंकर महाराजांच्या जीवनावर आधारित ''साद देती हिमशिखरे'' व अंतरीचा मागोवा या जी.के.प्रधान.लिखित दोन अध्यात्मिक पुस्तकातून बरीच माहिती मिळते. समाधी मंदिरातही ग्रंथ मिळतात. श्री शंकर महाराज अगदी अलीकडच्या काळात होऊन गेलेले सत्पुरुष. त्यांची समाधी मठ पुणे येथे सातारा रस्त्यावर धनकवडी भागात आहे. त्यांच्या समाधीचा दिनांक वैशाख शुद्ध अष्टमी शके १८६९. समाधीची अधिकृत नोंद आहे. पण बालपण, माता-पिता, शिक्षण, गुरू, साधना, शिष्य-संप्रदाय इत्यादींचा तपशील हवा तसा मिळत नाही.

शंकर महाराजांनी एकदा म्हटले होते, 'मै कैलास का रहनेवाला हूँ, मेरा नाम है शंकर'! ते खरोखरच शंकराचे अवतार असावेत. नाशिक जिल्ह्यात अंतापूर नावाचे गाव आहे. तिथे चिमणाजी नावाचे गृहस्थ राहात होते. त्यांना मूल-बाळ नव्हते. ते शिवाचे भक्त होते. एकदा त्यांना स्वप्नात दृष्टान्त झाला. 'रानात जा. तुला मुल




मिळेल. घेऊन ये.' ते त्या दृष्टान्ताप्रमाणे रानात गेले. तिथे त्यांना हा दोन वर्षांचे मुल मिळाले. शंकराचा प्रसाद म्हणून त्याचे नाव 'शंकर' ठेवले. 'शंकर' या माता-पित्याजवळ काही वर्षे राहिला. नंतर या बाळाने माता-पित्यांनाच आशीर्वाद दिला, 'तुम्हाला पुत्रप्राप्ती होईल!' आशीर्वाद देऊन शंकर बाहेर पडला. नाव नाही, रूप नाही, एक स्थान नाही. श्री शंकर महाराजांना नेमके एक नाव नाही. ते अनेक नावांनी वावरत. 'शंकर' या नावाप्रमाणेच 'सुपड्या', 'कुंवरस्वामी', 'गौरीशंकर' अशा नावानीही ते ओळखले जात. ही नावे कळली एवढेच! आणखीही काही नावांनी ते वावरत असावेत. 'नाव' जसे एक नाही, तसेच त्यांचे 'रूप'ही. काही ठिकाणी त्यांचा उल्लेख 'अष्टावक्र' असाही केलेला आढळतो. त्यांचे डोळे मोठे होते, ते अजानुबाहू होते, त्यांची गुडघे वर करुन बसण्याची पद्धती होती. ते

वेगळ्या अर्थाने 'बहुरूपी होते.

ते कधी एका स्थानीही राहात नसत. त्रिवेणी संगम, सोलापूर, अक्कलकोट, त्र्यंबकेश्वर, नाशिक, नगर, पुणे, हैद्राबाद, तुळजापूर, औदुंबर, श्रीशैल- अशा स्थानी त्यांची भटकंती असायची. सांगितली एवढीच स्थाने असतील असेही नाही. म्हणजे शंकर महाराजांचे 'नाम-रूप-स्थान' सांगणे कठीण आहे.




कारण खऱ्या अर्थाने ते वैराग्यसंपन्न होते. म्हणूनच 'शंकर' होते.

सद्गुरू शंकर महाराज यांचे मंदिर काशी मध्ये आहे. तिथे बाबांना खिचडी बाबा म्हणतात. श्री शंकर महाराज योगीराज होते, याचा अनेकांनी अनेक प्रकारे प्रत्यय घेतला आहे. ते स्वत: मात्र नेहमी म्हणत, 'सिद्धीच्या मागे लागू नका.' पण त्यांनी आपले योगसामर्थ्य कळत-नकळत अनेकांच्या प्रत्ययाला आणून दिले. काहींना 'सिद्धी' हवी असते ती 'प्रसिद्धी'साठी, त्याने नावलौकिक वाढतो, धन-दौलत मिळते, शिष्य-परिवार वाढतो, म्हणून श्री शंकर महाराज म्हणत 'सिद्धीच्या मागे लागू नये' त्यांना स्वत:ला सिद्धी प्राप्त होत्या पण त्यांनी धन-दौलत, नावलौकिक वा शिष्य-परिवारादि उपाधी मागे लावून घेतल्या नाहीत.

ते स्वत: खऱ्या अर्थाने सिद्धींच्या मागे लागले नाहीत. पण शंकर महाराज अलौकिक पुरुष होत, हे चिकित्सक विद्वानांनाही मान्य होते. आचार्य अत्रे, न्यायरत्न विनोद यांच्यासारखे प्रकांड पंडित शंकर महाराजांना मानीत. हे विद्वान त्यांची योग्यता जाणून होते.

महाराज म्हणत, 'मला जाती, धर्म काही नाही. ते स्वत: खरोखरीच सर्वांशी समभावाने वागत. त्यामुळे त्यांच्याकडे मुसलमानही येत. एका मुसलमानाने त्यांना आपली काही अडचण सांगितली. शंकर महाराजांनी त्यांना काय सांगावे? 'अरे, तू नमाज पढत नाहीस. नमाज पढत जा. तुझी अडचण दूर होईल.' ते काय शिकले होते कुणास ठाऊक! पण काही दीड शहाण्या विद्वानांना त्यांनी अस्खलित इंग्रजीतून उत्तरे दिली. त्यांना इंग्रजीचे ज्ञान कसे नि कुठे झाले, कुणास ठाऊक.अनेक गोष्टी अनाकलनीय होते.

पुण्यात आप्पा बळवंत चौक प्रसिद्ध आहे. आप्पा बळवंत मेहेंदळे यांचा वाडा चौकातच आहे.. बळवंतराव मेहेंदळे हे पानिपतच्या लढाईत लढले होते. त्यावेळी 'अप्पा बळवंत' हा केवळ बारा वर्षांचा होता. सरदार मेहेंदळे यांचा वाडा होता म्हणून त्या चौकाचे नाव 'आप्पा बळवंत चौक''. मेहेंदळे यांच्या घराण्यातील 'ताईसाहेब मेहेंदळे' शंकर महाराजांमुळे प्रसिद्धीस आल्या.

एक दिवस शंकर महाराजांनी ताईसाहेब मेहेंदळे यांच्या गळ्याला बोटाने स्पर्श केला नि सांगितले, 'ज्ञानेश्वरी सांग.' ताईसाहेब ज्ञानेश्वरीवर प्रवचने करू लागल्या.'

ताईसाहेब मेहेंदळे आपल्या वाड्यातच प्रवचने करीत. मेहेंदळे वाड्यात वरती माडीवर मोठा दिवाणखाना होता. तिथे ही प्रवचने चालत. तो मोठा दिवाणखाना श्रोत्यांनी भरून जात असे. त्यांच्या मुखातून साक्षात सरस्वती अवतरायची. त्या वेदोपनिषदांची, आचार्यांची अवतरणे देण्याच्या भानगडीत सहसा पडत नसत. पण वेदांत, योगशास्त्र अशा काही अभूतपूर्व रीतीने सांगत की, प्रगाढ पंडितांनी माना डोलवाव्या. त्या ज्ञानेश्वरी सांगत, पण ज्ञानेश्वरीची काव्यमयता, शास्त्रीयता, वैचारिक सुसंगती नि झेप त्यांच्या प्रवचनांतून अनायासे प्रकट होई. विशेष असे की, त्यांचे पतीही त्यांची ज्ञानेश्वरी ऐकायला बसत. ताईसाहेब मेहेंदळ्यांची प्रवचने ऐकायला काही वेळा शंकर महाराजही येत. मेहेंदळे पती-पत्नीची त्यांच्यावर प्रगाढ श्रद्धा होती.

श्री शंकर महाराजांनी मोठमोठी व्याख्याने, प्रवचने केली नाहीत. एखाद्या ग्रंथावर टीका लिहिली नाही. आलेल्या व्यक्तींना त्यांचे साधेसुधे मार्गदर्शन असे-

महाराज म्हणतात,आचरण महत्त्वाचे, ग्रंथांचे वाचन नि अभ्यास आचरणात येईल तेवढाच खरा.ते म्हणत, 'भावनेने भिजलेले असेल, ते भजन'. त्यांनी अनेकांना सांगितले, 'माता-पित्याची सेवा करा. कुलदेवतेची आराधना करा. यापेक्षा अधिक काही नको.'

**(क्रमशः)**

# भिकारी राजाची गोष्ट

ज्योतिर्मय साहित्य



स्मिता आणि दीपक हे आमचे कौटुंबिक स्नेही. स्मिताचा मला संदेश आला ''तुझं लिखाण वाचताना मला माझ्या मुलाचे, सौरवचे, कितीतरी क्षण आठवतात. मला तुला काही सांगायचंय.'' असं म्हणत तिनं सौरवचीं गोष्ट सांगितली आणि माझ्या मनात विचार गर्दी करु लागले. ती केवळ तीन वर्षांच्या मुलाची गोष्ट नव्हती, तर एका निरागस मनाचं विचारविश्व मांडणारा तो आरसा होता. मे महिना होता उन्हाळ्याची सुट्टी, आणि त्यात भर म्हणजे वारंवार होणारं भारनियमन. संध्याकाळी वीज गेली की घरभर अंधार. आई-वडिलांनचं काम वाढायचं ते म्हणजे मुलांसाठी काहीतरी मनोरंजन शोधणं. कारण त्यावेळी मोबाईल फोन्स हातात नव्हते. मग कधी गाणी, कधी गप्पा, तर कधी गोष्टी. एका संध्याकाळीही असंच काहीसं झालं. बरीच मुलं गोल करुन बसली होती. सगळ्यांनी आपापल्या गोष्टी सांगितल्या. शेवटी सौरवचा नंबर आला. सगळ्यांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू आता सौरव होता. तो कोणती गोष्ट सांगतोय असं सर्वांनाच वाटत होतं. त्यानं थोडा वेळ विचार करण्यात घालवला. काही क्षणातच त्याच्या डोळ्यांत चमक आली होती. आणि म्हणाला ''माझ्या गोष्टीचं नाव आहे राजा आणि भिकारी.'' पुढे सौरव म्हणाला, ''एक असतो राजा आणि तो असतो भिकारी. संपली माझी गोष्ट.'' इतकंच. क्षणभर सगळे थक्क झाले आणि कुणीच काही बोललंच नाही. नंतर मात्र मोठा हशा पिकला. ''असं कसं रे सौरव!'' ''ही कसली गोष्ट?'' ''अरे पुढं सांग ना!'' सौरव ठाम होता. माझी गोष्ट एवढ्यावरच संपली ये. आता तर स्मिताही गोंधळली. ती स्वतःच्या मुलाकडे पाहत राहिली त्याच्या चेहऱ्यावर ना शंका होती ना कसला गोंधळ.. तो शांत होता, जणू त्याने काहीतरी अत्यंत अर्थपूर्ण सांगून टाकलं आहे. मुलाच्या तोंडून बाहेर पडलेले हे निरागस शब्द इतके साधे, पण विचार करण्यास भाग पाडणारे होते. तीन वर्षांचं बालमन 'राजा' आणि 'भिकारी' या दोन टोकांच्या प्रतीकांना एकत्र आणतं. हे केवळ शब्द नव्हते तर भावविश्वाचा तो एक चमत्कार होता. स्मिता विचारात पडली. राजा भिकारी कसा असू शकतो? ती स्वतःलाच प्रश्न विचारत होती. कदाचित तिला हे ''चुकलेलं विधान'' वाटत असावं. पण मुलं ''बरोबर'' आणि ''चूक'' या चौकटींत राहून विचार करत नाहीत. त्यांच्यासाठी प्रत्येक गोष्ट अनुभवाची असते. सौरवच्या गोष्टीत तो अनुभव म्हणजे ''घेणं'' आणि ''देणं'' याचं बालपणीचं आकलन असावं.

सगळी मुलं आपापल्या घरी गेल्यावर स्मितानं सौरवला विचारलं, ''राजा भिकारी कसा रे तुझ्या गोष्टीतला? आणि मग गोष्ट पुढे का गेली नाही रे?'' तेवढ्यात आठ वर्षांची श्वेता म्हणाली, ''आई, तूच तर रोज गोष्टीत सांगतेस ना राजाला सगळे काही ना काही देतात. कुंभार मडकं देतो, लोहार कुऱ्हाड देतो, चांभार चप्पल देतो, शिंपी सदरा देतो शेतकरी धान्य देतो मग जो सगळ्यांकडून घेतो, तो भिकारीच ना?'' हे उत्तर ऐकून स्मिता गडबडून गेली. तिच्या चेहऱ्यावर संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या. ती गप्प राहिली होती त्यावेळी. स्मिताची गोड गोष्ट ऐकल्यावर


सविता कारंजकर
(मो)९९२२८१४१८३

आता मला सौरवच्या विचारप्रक्रियेवर विचार करायचा होता बालमनाचं हे विश्लेषण केवळ म्हणजे बिन अर्थाचे शब्द नव्हतेच मुळी, त्या त्याच्या संवेदना होत्या. तीन वर्षांचं मूल समाजातील भूमिकांकडे, देणं-घेणं याकडे ज्या सहजतेने पाहतं, तेच नंतर आपण मोठे झाल्यावर हरवून बसतो. आपण 'राजेपण' म्हणजे सत्ता, संपत्ती, वर्चस्व असं मानतो, पण सौरवच्या दृष्टीने 'राजेपण' म्हणजे देण्याची क्षमता आणि 'भिकारीपण' म्हणजे सतत घेणं. किती सूक्ष्म विचार!

ही गोष्ट ऐकताना तिथे असलेलं प्रत्येक मूल काही क्षण निःशब्द झालं. कारण त्यांच्या दृष्टीने सौरवने गोष्ट संपवली नव्हती उलट त्याने ती खुली ठेवली होती, जणू प्रत्येकाने स्वतःचं उत्तर शोधावं असं. हीच तर बालकथांची जादू असते त्या उत्तर देत नाहीत, तर त्या प्रश्न. निर्माण करतात. आई म्हणून स्मिताच्या मनात त्या क्षणी अनेक भावना गुंतल्या होत्या अभिमान, आश्चर्य, आणि थोडं अस्वस्थ चिंतन. आपण मुलांना गोष्टी सांगतो, पण कधीकधी ते त्या गोष्टींमधून आपल्यालाच आरसा दाखवतात असंही वाटतं पण मुलं शब्दांपलीकडचं पाहतात हे नक्की. ते आपलं बोलणं ऐकत नाहीत, ते आपलं जगणं पाहतात. सौरवची ''राजा आणि भिकारी'' ही दोन ओळींची गोष्ट जरी लहान असली, तरी त्या गोष्टीच्या अंतरंगात विचारांचा खजिना दडलेला होता सौरवच्या विचार प्रक्रियेचं निरीक्षण, ऐकणाऱ्यांच्या मानसिक प्रतिक्रियांचा वेध आणि आईच्या अंतर्मनातील भावनांचं सूक्ष्म चित्रण यात करायला हवंय. सौरवची ''राजा आणि भिकारी'' ही दोन ओळींची गोष्ट संपताच, त्या लहानग्या श्रोत्यांच्या चेहऱ्यावर गोंधळ होता ही गोष्ट एवढ्यात संपली का? त्यांच्या कल्पनेत ''गोष्टी'' म्हणजे सुरुवात, प्रसंग, शेवट, आणि शेवटी 'राजा' जिंकतो किंवा असं काहीतरी ठरलेलं असतं. पण इथे गोष्ट अचानक थांबली आणि त्यांच्या मनाला गोष्टीचा अपुरेपणा पचला नाही. मग सुरू झाला हशा . हसणं म्हणजे नेहमीच चेष्टा नसते; कधी कधी आपल्या मनातील गोंधळ लपविण्याचा तो एक प्रयत्न असतो. त्या मुलांना सौरवचं म्हणणं समजलं नव्हतं, पण त्यांना काहीतरी भिन्न ऐकायला मिळालं होतं. त्यांच्या छोट्या जगात 'राजा' म्हणजे सोन्याचा मुकुट, घोड्यावर बसलेला, शूर आणि श्रीमंत; आणि 'भिकारी' म्हणजे रस्त्यावरचा गरीब माणूस. हे दोन शब्द एकत्र आले, म्हणजे त्यांच्या संकल्पनेला धक्का बसला. त्यांच्या मनातल्या ''परिचित चौकटी''ची मोडतोड झाली आणि त्यावर त्यांनी दिलेली पहिली प्रतिक्रिया म्हणजे हसू. सौरवच्या ''राजा आणि भिकारी'' या दोन ओळींनी त्याच्या आईच्या मनातही अनेक प्रश्न निर्माण झाले.. तिला जाणवलं मुलं विचार करतात, अनुभवतात आणि त्यांच्या छोट्या जगात मोठे प्रश्न निर्माण होतात.. त्यांची गोष्ट थांबते, पण आपल्या विचारांची गोष्ट तेव्हाच सुरू होते. श्वेतानं या स्मिताचं विचारचक्र थांबवलं. ती म्हणाली, ''खरा राजा म्हणजे शिवछत्रपती कारण त्यांनी लोकांसाठी स्वराज्य निर्माण केलं, स्वतःसाठी नाही.'' सौरव तिच्याकडे निरागस नजरेनं पाहत होता, जणू त्यालाही आता त्या 'राजा'चा अर्थ समजायला लागला होता. स्मिताला एक आई म्हणून या वाक्याने किती समाधान दिलं असेल ना? मुलांनी गोष्टीतून घेतलेला अर्थ तिच्या शिकवणीपेक्षा मोठा ठरला होता. नक्कीच तिला वाटलं असेल की ''आज माझ्या घरात खरे राजे जन्मलेत विचारांचे, समजुतीचे.''

# विधवा स्त्रीची घालमेल

ज्योतिर्मय साहित्य



स्त्री, जगातील सर्वांत उंच शिखर आहे, स्त्री अनंत काळाची माता आहे आणि स्त्री सर्वगुणसंपन्न आहे सोबतच ती ममतेने भरलेली आहे म्हणूनच तिला जननी सुद्धा म्हटले जाते. मग ती, स्त्री कोणतीही असो शेवटी ती एक स्त्रीच असते. पण, एका अर्थाने बघितले तर याच समाजात सर्वंच स्त्रीयांना एकसारखाच सन्मान, आदर, आपुलकी, मदत मिळते का. .? हा एक भारी मोठा प्रश्नच नाही तर विचार करायला लावणारी बाब आहे, सोबतच या स्वतंत्र भारत देशात ज्या काही स्त्रीयांच्या बाबतीत बघायला मिळते ती स्त्री म्हणजेच ''विधवा महिला होय''.

समाजात असणाऱ्या विधवा स्त्रीयांकडे बघण्याचा दृष्टीकोन अजूनही त्याच प्रकारचा आहे जो आधी बघायला मिळत होता. अजूनही समाजात पाहिजे तेवढ्या प्रमाणात सुधारणा झालेली दिसून येत नाही. म्हणून बऱ्याच ठिकाणी नको ती वागणूक आणि विचारसरणी बघून माणसाला, माणूस म्हणावे की नाही हाच एक विचार मनात येत असतो. एवढी मानसिकता बदललेली दिसून येत आहे आणि याच विचारसरणीकडे बघून विधवा स्त्री या बहुतांश कोणत्याही कार्यक्रमात त्यांची उपस्थिती दिसून येत नाही. एखादे धार्मिक कार्य होत असते आणि अचानक त्यावेळी विधवा स्त्री तेथे हजर दिसली की, लगेचच कुजबुज चालु होते आणि ती कुजबुज आधी महिलांपासून सुरू होते. आणि याचा फायदा मग पुरूषांना होत असतो. एक महिला असून सुद्धा, महिलेच्या भावना समजू शकत नाही अशा काही सुशिक्षित असलेल्या अज्ञानी महिलांमुळे एखाद्या विधवा महिलेला दहा लोकात अपमान सहन करावा लागतो. आणि तेही महिलांच्या समोर तेथे उपस्थित असलेल्या अशा महिलांना सुशिक्षीत महिला म्हणता येईल का..? अशा अनपढ, अज्ञानी विचारसरणीमुळे हळूहळू समाजात नकारात्मकतेचे विष पसरत जाते आणि मग त्या निरपराध विधवा महिलेला क्षणोक्षणी अपमानाचा विष प्यावा लागतो आजही समाजात दिसत असलेली ही सत्य परिस्थिती आहे.

असल्या प्रकारच्या विचारसरणीमुळे विधवा स्त्रीची घालमेल होत असते. म्हणून त्या स्वतःहून, कुठेही उपस्थिती दर्शवत नाही. कारण ती विधवा स्त्री एखाद्या कार्यक्रमात हजर दिसली की, तिच्या विषयी चर्चा आपोआप चालू होतात.पण, समाजात राहणारे लोक एका गोष्टींना का म्हणून विसरतात...? की, याच विधवा स्त्रीयांच्या त्यागातून देशात सुख, समाधान, आनंद टिकून आहे,तिच्या अफाट त्यागामुळे सर्वजण रात्रीची सुखाची झोप घेऊ शकतात, तिच्या संघर्षामुळे, सण, उत्सव साजरे करतात आणि ती अभागिन कशी काय होऊ शकते..? आणि ती धाडसी स्त्री दुसरी कोणी नसून सीमेवर लढा देणाऱ्या वीर देशभक्ताची, सैनिकाची पत्नी असते आणि आज याच वीर पत्नीला अपशगुणी समजून तिला नाव ठेवतात, तिला जवळ करत नाही, एवढेच नाही तर काही जणांना तिची सावली तर बाजूला राहिली तिचा स्पर्श जरी झाला तरी विटाळ समजून आंघोळ करतात. पण, तिच्या शूरवीर पतीचे देशासाठी दिलेले बलिदान दिसत नाही. ही आहे समाजातील लोकांची विधवा स्त्रीयांविषयीची नकारात्मक भावना आणि शोकांतिका आहे . विधवा स्त्रीचा स्पर्श झाल्याने आंघोळ केल्यावर माणूस पवित्र होत नसतो तर मनात असलेली नकारात्मक विचार सरणी धुवून काढल्याने सत्याचे दर्शन होत असते. पण, आजकाल विधवा स्त्रीयांच्या बाबतीत मात्र बऱ्याच ठिकाणी भेदभाव बघायला मिळत असतो. हे असले कृत्य बघून आज माणूस कोणाला म्हणावे हेच कळेनासे झाले आहे. विधवा स्त्री ही सुद्धा एक आई असते आणि ती, आपल्या लेकरांना लहानाचे मोठे करते तेव्हा तिच्या लेकरांना विटाळ होत नाही. पण, जेव्हा तिच्या मुलीचे किंवा मुलाचे लग्न असो किंवा कोणताही कार्यक्रमात तिचा स्पर्श जरी झाला तरी अनेकांच्या भुवया उंचावतात, त्यांच्या मेंदूत असलेले किडे चालायला सुरू होतात आणि त्या मातेला, शुभ कार्यापासून दूर लोटले जाते. ही समाजात असलेली नकारात्मक रूढी परंपरा आहे. अशा वेळी ती विधवा माता डोळ्यातील अश्रू लपवून एखाद्या गुन्हेगार असते त्याप्रमाणे तेथे गप्प राहून बसलेली असते. क्षणभर तिला सुद्धा वाटते की, मी जर आज विधवा राहिली नसती तर माझ्या लेकराच्या शुभ कार्यात सहभागी झाली असती पण,तिच्या भावना मात्र कोणी समजून घेत नाही. भलेही जग चंद्रावर जात आहे पण, कुठेतरी विधवा स्त्रीयांच्या विषयी मात्र विचार ज्या प्रकारचे असायला पाहिजे त्या प्रकारचे दिसत नाही. विधवा महिलांना न्याय, सुरक्षा,अधिकार, मदत मिळावी यासाठी महापुरुषांनी आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावले मात्र त्यांच्या संघर्षाचा आज कुठेतरी समाजाला विसर पडत आहे. त्यामुळे विधवा स्त्रीयांना पाहिजे त्याप्रकारचा न्याय व सन्मान मिळत नाही ही आजची वास्तविकता आहे. म्हणून विधवा स्त्रीयांची त्याच प्रकारची घालमेल होत आहे बघून आश्चर्य वाटतो. हे कुठेतरी थांबायला पाहिजे आणि त्यांना समाजात सन्मान मिळायला पाहिजे ही आज अत्यंत काळाची गरज आहे.


सौ.संगीता संतोष ठलाल
मु. कुरखेडा जि. गडचिरोली
७८२१८१६४८५

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559